मराठवाडा नेता
लातूर, शुक्रवार, दि.०२ जुलै २०२१

# एमआयटी पुणेतर्फे पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद

पुणे, दिः १ :....

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पहिली 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरूवार, दि. १५ जुलै २०२१ ते रविवार, दि. १८ जुलै २०२१ या कालावधीत ऑनलाइन आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्घाटन गुरूवार दि. १५ जुलै २०२१ रोजी दुपारी २ वा. होईल. या सत्राचा विषय 'भारतीय संतसाहित्याचा उच्चशिक्षणात समावेश काळाची गरज' हा आहे. समारोप सत्र रविवार, दि. १८ जुलै २०२१ रोजी दुपारी ४.३० वा. होईल.

या पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष जगद्गुरु तत्त्वज्ञ संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. बापूसाहेब मोरे आणि सुप्रसिध्द कीर्तनकार व प्रवचनकार आणि हाडाचे निष्ठावंत वारकरी ह.भ.प. रविदास महाराज शिरसाट हे कार्याध्यक्ष म्हणून कार्य करणार आहेत.

एमआयटी विश्र्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांची संकल्पना आणि पुढाकार आणि विद्यापीठाचे अध्यक्ष विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदशनाखाली ही परिषद संपन्न होईल.

भारतीय संत साहित्यामध्ये अनेक वैज्ञानिक व तात्त्विक तथ्यांचा उल्लेख आढळतो. अर्थात भारतीय संतांना भारतीय ज्ञानपरंपरेतून उपजलेल्या अनेक शोधांबद्दल माहिती होती, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.अनेक पाश्चात्त्य वैज्ञानिकांच्या नावे असलेले शोध हे पूर्वी भारतामध्ये लागले असल्याचे आता जगासमोर आले आहे. म्हणजेच, ज्ञान, विज्ञान, तत्त्वज्ञान, भक्ती आणि श्रद्धा या सर्वांचा ऊहापोह करणारे संतसाहित्य ह्याचा उच्चशिक्षणात समावेश होणे ही काळाची गरज आहे. हा हेतू ठेवून, चार दिवसांची ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेत ज्या कीर्तनकार, प्रवचनकार आणि विणेकरांना सहभागी व्हायचे असेल, त्यांनी शालीकराम महाराज खंदारे मो.९८५००७४२०३, महेशमहाराज नलावडे मो. ९८२२५४७७२७ किंवा रामचंद्र महाराज इंगोले यांच्याशी ९३०९८२४७४० मोबाइलवर संपर्क साधून नाव नोंदणी करावी. असे आवाहन पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे समन्वयक डॉ. संजय उपाध्ये यांनी केले आहे.

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, शुक्रवार, दि.०२ जुलै २०२१

# एमआयटी तर्फे पहिली भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद

सुराज्य/पुणे : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पहिली 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद' गुरुवार, दि. १५ जुलै ते रविवार, दि. १८ जुलै या कालावधीत ऑनलाईन आयोजित करण्यात आली आहे.

या परिषदेचे उद्घाटन गुरुवार दि. १५ जुलै २०२१ रोजी दुपारी २ वा. होईल. या सत्राचा विषय 'भारतीय संतसाहित्याचा उच्चशिक्षणात समावेश काळाची गरज' हा आहे. समारोप सत्र रविवार, दि. १८ जुलै २०२१ रोजी दुपारी ४.३० वा. होईल.

पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष जगद्गुरु तत्त्वज्ञ संत तुकाराम महाराजांचे वंशज ह.भ.प. श्री. बापूसाहेब मोरे आणि सुप्रसिद्ध कीर्तनकार व प्रवचनकार आणि हाडाचे निष्ठावंत वारकरी ह.भ.प.श्री. रविदास महाराज शिरसाट हे कार्याध्यक्ष म्हणून कार्य करणार आहेत. एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांची संकल्पना आणि पुढाकार आणि विद्यापीठाचे अध्यक्ष विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदर्शनाखाली ही परिषद संपन्न होईल. या परिषदेत ज्या कीर्तनकार, प्रवचनकार आणि विणेकऱ्यांना सहभागी व्हायचे असेल, त्यांनी शालीकराम महाराज खंदारे मो.९८५००७४२०३, महेश महाराज जलावडे मो.९८२२५४७७२७ किंवा रामचंद्र महाराज डुंबोले यांच्याशी ९३०९८२४७४० मोबाईलवर संपर्क साधून नाव नोंदणी करावी, असे आवाहन पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या संयोजन समितीचे समन्वयक डॉ.संजय उपाध्ये यांनी केले आहे.